# महाराष्ट्र शासन – जलसंपदा विभाग
## कार्यालय- अधीक्षक अभियंता,तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक, (नागपूर परिमंडळ) पाटबंधारे विभाग, नागपूर
**प्रशासकिय इमारत क्र .१ दुसरा माळा सिव्हील लाईन नागपूर-४४०००१**

## (विशेष भरती मोहितेअंतर्गत अपंग संवर्गातील पदांच्या भरतीसाठी जाहिरात क्र.१/२०११)

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभागाचे पत्र क्र अपंग-१२११/प्र.क.११६/२०११ दिनांक २४/०६/२०११ २) पत्र क्र १२११/(प्र.क.११६/२०११) दिनांक ११/०८/२०११. नुसार जलसंपदा विभागांतील नागपुर प्रादेशिक विभागा अंतर्गत विविध कार्यालयातील अपंगाची विशेष भरती मोहिम अंतर्गत सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन स्पर्धात्मक परिक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहे. यात वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक / टंकलेखक, भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल, अनुरेखक, प्रयोगशाळा सहाय्यक, शिपाई, यांची खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता अंपग प्रवर्गातील सरळ सेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत, (M.K.C.L.) यांच्या मार्फत विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. **सदर रिक्त पदे नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, जिल्हा अंतर्गत रिक्त पदे आहेत.**

**भरावयाचे पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-**

| अ. क्र. | पदाचे नांव / पदाची वेतन बँड ग्रेड वेतन | रिक्त पदाची एकुण संख्या | पदांची संख्या प्रवर्गनिहाय | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंध/ अल्पदृष्टी | अस्थीव्यंग | मुकबधीर /कर्णबधीर |
| **गट-क** | | | | | |
| १ | **वरिष्ठ लिपीक,** वेतन बँड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. २४००/- | ७ | २ (LV / B) | ३ (OL/ BL/OA/ OAL) | २ (HH) |
| २ | **कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक** वेतन बँड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. १९००/- | ७ | ४ (LV / B) | ० (OL/ BL) | ३ (HH) |
| ३ | **भांडारपाल** वेतन बँड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. ४२००/- | १ | - | १ (OL) | - |
| ४. | **सहाय्यक भांडारपाल,** वेतन बँड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. १९००/- | १ | - | १ (OL) | - |
| ५. | **अनुरेखक (आरेखक श्रेणी-३)** वेतन बँड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. २०००/- | २ | २ (LV / B) | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | **प्रयोगशाळा सहाय्यक,** वेतन बॅंड :- ५२००-२०२००/- ग्रेड वेतन :- रु. २०००/- | १ | - | १ (OL/ BL/ OA/ OAL) | - |
| **गट-ड** | | | | | |
| १. | **शिपाई** **वेतन बॅंड :- ४४४०-७४४०/-** ग्रेड वेतन :- रु. १३००/- | ११ | ६ (LV / B) | -- | ५ (HH) |

**अंपगाचे प्रकार :-** अंध/अल्पदृष्टी :- **LV**-Low Vision, **B**-Blind,
अस्थीव्यंग :- **OA**-One Arm, **OL**-One Leg, **BL**-Both Legs,
**OAL**- One Arm & One Leg,
मुकबधीर /कर्णबधीर :- **HH**-Hearing Handicapped

१. **शैक्षणीक अर्हता :-**

| | | |
|---|---|---|
| १) वरिष्ठ लिपीक | :- | कोणत्याही मान्यता प्राप्त शाखेतील विद्यापिठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| २) भांडारपाल | :- | कोणत्याही मान्यता प्राप्त शाखेतील विद्यापिठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| ३) कनिष्ठ लिपीक / टंकलेखक | :- | १). माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी. उत्तीर्ण ) २).टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मी. किंवा मराठी ३० श.प्र.मी. |
| ४) सहाय्यक भांडारपाल | :- | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी. उत्तीर्ण ) |
| ५) अनुरेखक | :- | १). माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी. उत्तीर्ण ) २) इंटरमिजीएट ड्राईग परिक्षा उत्तीर्ण किंवा मान्यत प्राप्त सिव्हील ड्राफ्टसमनचा कोर्स उत्तीर्ण (महाराष्ट्र शासनाच्या मान्यता प्राप्त संस्थेमार्फत) |
| ६) प्रयोगशाळा सहाय्यक | :- | मान्यता प्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेची पदवी **(रसायण शास्त्र)** मध्ये परीक्षा उत्तीर्ण. किंवा कृषी विद्यापिठाची पदवीका |
| ७) शिपाई | :- | १) प्राथमिक शाळेमधून किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण |

## १) अर्ज सादर करणेबाबत आवश्यक सुचना :-

वरील रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तसेच काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण या बाबत बदल करणे, परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अशंतः बदल करणे तसेच सेवा प्रवेश नियमात बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार नागपूर प्रादेशिक निवड समीती, नागपूर स्वतःकडे राखुन ठेवत आहे. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारीबाबत समितीचा निर्णय अंतिम राहील.

## २) परीक्षेचे स्वरुप :-

अ) वरिष्ठ लिपीक / भांडारपाल / या संवर्गातील पंदाकरीता लेखी परीक्षा २०० गुणांची राहील. या पंदाकरीता परीक्षेचा दर्जा मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. पंरतु मराठी या विषयांच्या प्रश्नपत्रीकेचा दर्जा उच्च माघ्यमिक् शांलात परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण असुन एकूण गुण २०० राहतील.

ब) कनिष्ठ लिपीक / टंकलेखक / सहाय्यक भांडारपाल या पदाकरीता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माघ्यमिक शांलात परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, व अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण असुन एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा राहील.

क) अनुरेखक पदासाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी २५ गुण असून, १०० गुणाची लेखी परीक्षा, ८० गुणाची व्यावसायीक चाचणी परिक्षा व २० गुणाची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

ड) प्रयोगशाळा सहाय्यक/शिपाई या पदासाठी लेखी परिक्षा ७५ गुणांची वस्तुनिष्ठ स्वरूपाची (Objective type) असेल. सदर परिक्षा ही शिपाई या पदाकरिता इयत्ता चौथी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित राहिल. तसेच प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता परीक्षेचा दर्जा मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. पंरतु मराठी या विषयांच्या प्रश्नपत्रीकेचा दर्जा उच्च माघ्यमिक् शांलात परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयावरील राहतील. लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मौखिक परीक्षेसाठी गैरहजर राहिल्यास त्याच्या नियुक्तीची शिफारस करता येणार नाही. उमेदवारांची अंतिम निवड लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल. उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी / मौखिक परीक्षेसाठी स्वखर्चाने हजर राहवे लागेल.

इ) उपरोक्त पंदाकरीता प्रश्नपत्रिका वरील नमुद वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (Objective type) राहील.

फ) शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ नुसार लिपीक-वर्गीय पदांसाठी वरीष्ठ लिपीक / भांडारपाल / कनिष्ठ लिपीक-नि-टंकलेखक वर्गाच्या समकक्ष असल्यामुळे उमेदवारांची निवड करतांना, मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल व लेखी परीक्षेमधून उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करुन उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

घ) **मुलाखती करीता बोलावण्यासाठी उमेदवारांची संख्याः-**

चौकीदार / प्रयोगशाळा परीचर लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा-या उमेदवारांची संख्या शासन निर्णय १९/१०/२००७ नुसार खाली नमुद केल्याप्रमाणे प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | रिक्त पदांची संख्या ५ पदापर्यत | मुलाखतीसाठी बोलावण्याच्या उमेदवारांची संख्या रिक्त पदांच्या संख्येच्या ५ पटीत (१:५) मात्र उमेदवाराच्या १५ इतक्या संख्येपर्यत मर्यादीत. |
| २) | ६ व त्याहुन अधिक पदासाठी | रिक्त पदांच्या संख्येच्या ३ पटीत (१:३) |

**सर्वसाधारण शर्ती व अटीः-**

१) उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमांन १८ वर्षा पेक्षा कमी व कमाल ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे). अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधीकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. तसेच सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी, हिन्दी भाषेचे ज्ञान व लिहीता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे.

३) सदर पदासाठी विहीत केलेल्या नमुन्यातील अर्ज सादर करावे लागतील. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रारुप नमुना अर्ज तसेच अर्ज प्राप्ती / स्विकृती केंद्राची यादी व पत्ते http://oasis.mkcl.org/wrd2011 संकेत स्थळावर अनुक्रमांक २४ मध्ये नमुद केल्या नुसार उपलब्ध असेल.

४) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अन्य आवश्यक प्रमाणपत्र अपंग / माजी सैनिक यांची सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराने या पूर्वी जरी त्याचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केद्रांकडे सेवायोजन कार्यालयाकडे/एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालय/येथे नोंदविले असेल तरी त्यांनी या पदाच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

६) शासकीय/निमशासकीय कर्मचा-यानी त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

७) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.अ.क्र.२०००/प्र.क्र १७/२०००/१२ दि १/जूलै/२००५ नुसार, सोबत जोडलेले लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे (अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमुद करुण सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे)

८) एखादया उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवडप्रक्रीयेतुन बाद करण्यांत येईल.

९) पदाची उपलब्ध संख्या विचारात घेता लेखी परिक्षेत समान गुण धारण करण्या-या उमेदवाराच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक २७/०६/२००८ मध्ये दिलेल्या सुचनाच्या अधिन राहुन निवड केली जाईल.

१०) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी, नियुक्ती प्रकीयेच्या कोणत्याही टप्पावर रद्द करण्यांत येईल.

११) या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदावर उमेदवाराची निवड न्यायालयीन, शासनाच्या विविध विभागाची शासन निर्णय व परिपत्रके यांतील निर्देशाच्या अधिन असेल.

१२) शासन सेवेत नियुक्त होणा-या उेदवाराना शासन निर्णय दिनांक ०१.११.२००५ अनुसार परिभाषीक अंशदान निवृत्ती वेतन लागु राहील.

१३) भरती प्रक्रिये संबंधी देण्यात येणा-या सुधारीत व अध्यावत सुचना कार्यालयीन व फलकावर व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत येईल.

१४) अपंग उमेदवाराने वरील पदासाठी अस्थिव्यंग / अंध अल्पदृष्टी / मुकबधीर कर्णबधीर असल्याबाबतचे सक्षम प्राधिकायाचे प्रमाणपत्र अर्ज सादर करते वेळी जोडणे आवश्यक आहे. अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. हे प्रमाणपत्र नसल्यास अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

१५) वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक / टंकलेखक, भांडारपाल, सहाय्यक भांडारपाल, अनुरेखक, प्रयोगशाळा सहाय्यक, शिपाई, या पदाची परिक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी नियोजित केली

आहे. त्यामुळे **अर्जदाराने कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करावा.** अर्जदाराने दिलेल्या पदाच्या विकल्पानुसार गुणवत्तेनुसार संबंधीत रिक्त पदे भरली जातील.

१६) लेखी / मौखीक परीक्षा **नागपूर** या शहरातील परीक्षा केंद्रावर होईल.

१७) आवश्यक शैक्षणिक पात्रता परिपूर्ण नसलेले / अपुर्ण / आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसलेले अथवा अर्जासोबत आवश्यक रोखीने फी चा भरणा केला नसलेले अथवा अर्जावर स्वतःचा फोटो नसलेले अथवा चुकीचे भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही अथवा कोणताहि पत्रव्यवहार करता येणार नाही.

१८) **पात्र उमेदवाराची अंतीम नियुक्ती ही वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यांत येईल.**

१९) उपरोक्त जाहिरात मा. आयुक्त कार्यालयाचे “ ना हरकत” प्रमाणपत्राच्या अटीचे अधीन राहील.

२०) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक प्रशिक्षण/प्रक्र-६१/२००१/३९/दिनांक १९/३/२००३ प्रमाणे **गट क** मधिल नव्याने नियुक्ती होणा-या सर्व कर्मचा-यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे अनिवार्य राहील.

२१) प्रारुप नमुना अर्ज जरी संकेत स्थळावरुन उतरवुन घेतला असला तरी उमेदवारांनी त्यांचे अर्ज अधिकृत अर्जावरच सादर करणे अनिवार्य आहे. सदर अधिकृत अर्ज या प्रक्रीयेसाठीचे अधिकृत अभिकरण महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (M.K.C.L.) यांचेमार्फत त्यांचे अधीकृत (ALC) केंद्रावरुन सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शासकीय व स्थानिक सुटया वगळुन) **रुपये २५/- (अक्षरी. रुपये पंचविस फक्त)** प्रमाणे रोख भरुन प्राप्त करुन घेता येतील सदर संपूर्ण व योग्यरित्या भरलेले अर्ज अधिकृत केंद्रात उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व नमुद कालावधीत स्विकारले जातील. ज्या प्राधिकृत (ALC) केंद्रावरुन अर्ज प्राप्त केला तेथेच अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उमेदवाराने समक्ष उपस्थित राहुन अर्ज सादर करावा.

२२) **उमेदवारानी ज्या प्राधिकृत (ALC) केंद्रावर अर्ज भरला असेल त्या प्राधिकृत (ALC) केंद्रावर भरलेल्या अर्जाचा गोषवारा (Printout) तपासुन पाहणे उमेदवारांची जबाबदारी राहील, जेणे करुन काही त्रुटी असल्यास त्रुटीचे निवारण केल्या जाईल. त्यांनतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाही यांची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी.**

२३) पदासाठी असणारे किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना त्या पदासाठी धेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परीक्षा केंद्र / बैठक क्रमांक ईत्यादी बाबतची माहिती (ALC) केंद्रावरुन उमेदवारांनी स्वतः प्राप्त करुन घ्यावी. या संबधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२४) **अर्जासोबत शुल्क (फी) आकारण्याबाबतः-** उमेदवारांकडून अर्जासोबत पुढीलप्रमाणे परीक्षा शुल्क हे (**MKCL**) च्या ज्या प्राधिकृत (**ALC**) केंद्रावर अर्ज स्विकारण्यात येईत. त्याच (**ALC**)_केंद्रावर **रोखीने** स्विकारण्यात येईल.

| १). लेखी परीक्षा | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| (वरीष्ठ लिपीक/ कनिष्ठ लिपीक-टंकलेखक / भांडारपाल /सहा. भांडारपाल / या पदासाठी | रु. १५०/- | रु. ७५/- |

| | | |
|---|---|---|
| २) लेखी परीक्षा व मुलाखत<br>अनुरेखक / प्रयोगशाळा सहाय्यक / शिपाई या पदासाठी) | रु. २००/- | रु. १००/- |
| ३) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. | | |

सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील. अर्ज परिपूर्ण असल्यास वरीलप्रमाणे परीक्षा शुल्काची रक्कम स्विकारली जाईल व त्याबाबतची पोच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary Sheet) अधिकृत केंद्राकडुन देण्यात येईल.

२५) अर्ज ज्या प्राधिकृत्त (ALC-Authorised Learning Centre) केंद्रावर भरले आहेत त्याच केंद्रावर हॉल तिकीट दिनांक १७ सप्टेबर-२०११ ते दिनांक २३ सप्टेबर -२०११ पावेतो कार्यालयीन वेळेत मिळेल. **हॉल तिकीट प्राप्त करुन धेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.**

२६) उमेदवारास लेखी व मौखीक परीक्षेसाठी नियोजीत परीक्षा केंद्रावर स्वखर्चाने यावे लागेल. तसेच लेखी परीक्षामध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

२७) उमेदवारास जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र व जाती वैघता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे

२८) सदरची पदे अस्थायी स्वरुपाची असुन शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केंव्हाही समाप्त करण्यात येईल.

२९) एम.के.सी.एल. या संस्थेच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रांची माहिती http://oasis.mkcl.org/wrd2011 या संकेतस्थळावर मिळेल. तसेच या जाहिरातीची प्रत खालील जिल्हा नियंत्रक अधीक्षक अभियंतांच्या कार्यालयात पहावयास मिळू शकेल.

| अ.क्र | कार्यालयाचे नांव | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | अधीक्षक अभियंता, गोसिखुर्द उपसा सिंचन मंडळ, आंबाडी (भंडारा) | आंबाडी (जलंसपदा वसाहत) पो. सिल्ली ता.जि. भंडारा | ०७१८४-८५२८०३ |
| २) | कार्यकारी अभियंता गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया | सिव्हील लाईन गोंदिया | ०७१८२-२२२३७७ |
| ३) | अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर | रेल्वे स्टेशन समोर, टेलीफोन एक्चेजचा बाजुला चंद्रपूर | ०७१७२-२५२५०६ |
| ४) | कार्यकारी अभियंता गडचिरोली पाटबंधारे विभाग, गडचिरोली | तुलतुली वसाहत, चंद्रपूर रोड, गडचिरोली | ०७१३२-२२२२३१ |
| ५ | कार्यकारी अभियंता वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा | आंबेडकर पुतळ्या जवळ, वर्धा | ०७१५२-२४३५४८ |
| ६. | अधीक्षक अभियंता दक्षता पथक (नागपूर परिमंडळ) पाटबंधारे विभाग, नागपूर | प्रशासकीय इमारत क्र. १ दुसरा माळा सिव्हील लाईन नागपूर | ०७१२-२५३०८९९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नागपूर | वैनगंगा नगर अजनी, नागपूर | ०७१२-२४३२७३३ |
| ८. | अधीक्षक अभियंता गोसिखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर | सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन नागपूर | ०७१२-२५६४१८२ |
| ९. | अधीक्षक अभियंता नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर | सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन नागपूर | ०७१२-२५६०२३४ |

३०) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नागपूर प्रादेशिक विभागातील कोणत्याही जिल्हयात व रिक्त पदी नियुक्ती देण्यांत येईल नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन रुजु होणे अनिवार्य राहील.

**रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील –**

१. अर्ज विक्रीचा कालावधी - दिनांक २९ ऑगष्ट -२०११ ते ७ सप्टेबर -२०११
२. अर्ज स्विकृतीचा कालवाधी - अर्ज विक्री दिनांक २९/०८/२०११ पासुन दिनांक **१३** सप्टेबर -२०११ पर्यन्त.

३. अर्ज छाननी कालावधी - दिनांक **१३** सप्टेबर -२०११ ते १४ सप्टेबर -२०११
४. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी - दिनांक. १५ सप्टेबर -२०११ ते **२१** सप्टेबर - २०११
५. लेखी परीक्षेचा - दिनांक **२५ सप्टेबर -२०११**
   अ) अनुरेखक वगळुन इतर पदां करीता - वेळ दुपारी १४.०० ते दुपारी १७.०० वा.
   ब) अनुरेखक पदा करीता - वेळ दुपारी १४.०० ते दुपारी १५.३० वा.

अर्ज विक्री व स्वीकृती ही एम.के.सी.एल.च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फत होईल. तसेच लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र अर्ज सादर केलेल्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रामधून समक्ष प्राप्त करुन घ्यावे लागेल. सदरची प्रवेशपत्रे पोस्टाने पाठविली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**(र.ना. ठाकरे)**
**सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती तथा**
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी,
दक्षता पथक (नागपूर परिमंडळ)
पाटबंधारे विभाग, नागपूर

**स्वा/-**
**(र.वा. निकुम)**
**अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती तथा**
मुख्य अभियंता गोसिखुर्द प्रकल्प
जलसंपदा विभाग, नागपूर